क्र.म.मं./९०४ दिनांक : १५/०९/२०१५

# - परिपत्रक -

मराठा मंदिरचे सभासदत्व सुरु करण्याबाबत सभासदांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांचा सर्वांगीण विचार करून दि.१२ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या ७० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंदिराचे सर्वसाधारण सभासद करून घेण्याचे ठराव क्र.०६/२०१५ नुसार ठरले आहे.

त्यानुसार मराठा मंदिरच्या घटनेच्या नियम क्र.८ मध्ये विहित केलेल्या वर्गवारीनुसार सर्वसाधारण सभासद होण्याकरिता अटी पुढीलप्रमाणे :-

१) मराठा मंदिरच्या विद्यमान सभासदाला फक्त दोन व्यक्तींना सर्वसाधारण सभासद
करून घेण्यासाठी शिफारस करता येईल.

२) प्रस्तावित व्यक्तीचे वय वर्ष ५० हून कमी असणे आवश्यक आहे.

३) प्रस्तावित व्यक्तीच्या संस्थेच्या सभासदत्वाच्या अर्जात शिफारस व अनुमोदन करणा-या सभासदाची आवश्यक माहिती व सही असावी.

४) प्रस्तावित व्यक्तीचे सभासदत्वासाठी प्राप्त झालेले अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाकडे असतील.

५) विद्यमान सभासदांनी त्यांच्या शिफारशीसह प्रस्तावित व्यक्तींचे अर्ज दि.१५ डिसेंबर २०१५ पर्यंत सन्मा.सरचिटणीस यांच्या नावे मराठा मंदिरकडे सादर करावेत. दि.१५ डिसेंबर २०१५ नंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

सभासदत्वाच्या अर्जासोबत रु.१०००/-(रुपये एक हजार फक्त) सभासद शुल्काचा धनादेश “ मराठा मंदिर ” च्या नावे सादर करावा.

सभासदत्वासाठीचा अर्ज मराठा मंदिरच्या कार्यालयात व वेबसाईट (www.marathamandir.com) वर उपलब्ध असेल.

(शशिकांत पवार)
सन्मा.सरचिटणीस
मराठा मंदिर.